सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयाकरिता एमटीएनएल, कुपरेज या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील जागा भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र.सवरी-१४१७/प्र.क्र.११७/१७/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,
दिनांक : १४ सप्टेंबर, २०१७

<u>संदर्भ</u> :- १) विधि व न्याय विभागाचा समक्रमांकाचा दि.३१.८.२०१७ चा शासन निर्णय.
२) सरकारी वकीलांचे कार्यालय, अपिल शाखा(रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.४.९.२०१७ चे पत्र.
३) सरकारी वकीलांचे कार्यालय, अपिल शाखा(रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.GP/ABV/२०१७ दि.१२.८.२०१७
४) महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, मुंबई यांचे पत्र क्र.DPB-S/Govt. Pleader/२०१७-१८.दि.१३/०९/२०१७.

शुध्दीपत्रक :

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील

१) ओळ क्र.२ मध्ये "अतिरिक्त ७००० चौ.फु. इतकी जागा" याऐवजी "अतिरिक्त ६३८५ चौ.फु. इतकी जागा" असे वाचावे.

२) ओळ क्र.४ मध्ये "रु.२८९.४० प्रति चौ.फु." याऐवजी "रु.३०३.८७ प्रति चौ.फु" असे वाचावे.

३) ओळ क्र.५ मध्ये "प्रति महिना रु.२०,२५,८००/- (रुपये वीस लाख पंचवीस हजार आठशे फक्त)" याऐवजी "रु.१९,४०,२१०/- (रुपये एकोणीस लाख चाळीस हजार दोनशे दहा फक्त) (लागू असलेल्या सर्व करासहित)" असे वाचावे.

४) ओळ क्र.६ मध्ये "वार्षिक रु.२,४३,०९,६००/- (रु.दोन कोटी त्र्येचाळीस लाख नऊ हजार सहाशे फक्त)" याऐवजी "वार्षिक रु.२,३२,८२,५२०/- (रु.दोन कोटी बत्तीस लाख ब्याऐंशी हजार पाचशे वीस फक्त)" (लागू असलेल्या सर्व करासहित)" असे वाचावे.

५) ओळ क्र.८ "येत आहे" च्या पुढे पुढील मजकुर समाविष्ट करण्यात येत आहे "उपरोल्लेखित भाडे दरात प्रतिवर्षी ५ टक्के इतकी वाढ होईल असे महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, मुंबई यांनी प्रस्तावित केले आहे. या प्रस्तावित भाडेवाढीस व त्यापोटी येणाऱ्या खर्चास शासनाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. त्यासाठी प्रतिवर्षी मंजूरी देण्यासाठी स्वतंत्र आदेश शासनामार्फत निर्गमित केले जाणार नाहीत."

२. प्रस्तुत शुध्दीपत्रक वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला,उपविभाग एक, अनु.क्र.१०, नियम क्र.११५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांन्वये तथा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८९९/१७/व्यय-५ दि.१४.०९.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१५१५२८१८४११२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2017.09.15 15:18:06 +05'30'

(आ. न. वसावे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
२) मा.राज्यमंत्री (विधि व न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव.
३) सर्व विधानमंडळ सदस्य.
४) मा.मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) अतिरिक्त मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) सरकारी वकील, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई.
९) उप महाप्रबंधक (कुपरेज), ६ वा मजला, कुपरेज टेलिफोन एक्स्चेंज इमारत, एम.के.मार्ग, मुंबई-२१.
१०) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती/का.८